# वारसा जतन समिती -

पुणे महानगरपालिकेने नागरी आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांबरोबर सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा जतन व संवर्धनाचे कार्य केले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धनाचे कामे वारसा विभागाकडून केली जातात. विभागाने पुणे शहरातील ऐतिहासिक वास्तूंचे इंटॅक संस्थेमार्फत सर्वेक्षण करून हेरिटेज ग्रेड I, II, III यादी तयार करण्यात आली आहे.

पुणे शहरात एकूण **२४९ वारसास्थळे** आहेत, त्यामध्ये **ग्रेड I** - ७९ , **ग्रेड II** - ८२ , **ग्रेड III** - ८८ इत्यादी वारसास्थळे आहेत. सदर पुणे मनपाच्या हद्दितील वारसा स्थळांची यादी हि पुणे मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे . https://www.pmc.gov.in/b/grading-listed-buildings

UDCPR २०२० मुद्दा क्र. १४.५.३ नुसार कोणत्याही हेरीटेज वास्तूमध्ये व परिसरात बदल व दुरुस्ती करावयाची असल्यास त्यासाठी वारसा जतन समितीची (हेरीटेज कमिटी) पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

पुणे मनपाच्या ऐतिहासिक ग्रेड १ व २ व ३ वास्तूंबाबतची माहिती , व त्यासाठी मान्यतेची प्रक्रिया याबाबतची माहिती UDCPR २०२० मधील मुद्दा क्र १४.५.८ मध्ये नमूद केली आहे तसेच https://www.pmc.gov.in/b/grading-listed-buildings या संकेतस्थळावर उपलब्ध आहे .

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम (UDCPR) क्र. १४.५.१० मधील तरतुदी अनुसरून पुणे महानगरपालिका हद्दीकरिता महाराष्ट्र शासनाच्या मान्येतेने वारसा जतन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

पुणे मनपाच्या हद्दीतील व पुणे मनपाच्या ऐतिहासिक वास्तूंच्या यादीतील यास्तुमध्ये काही बदल करावयास असल्यास खालीलप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे .-

१) ज्या ऐतिहासिक वास्तूमध्ये व वास्तूलगत बदल वा दुरुस्ती करावयाची आहे त्याचा सविस्तर प्रस्ताव वारसा व्यवस्थापन विभागाकडे पाठविण्यात यावा . त्यासोबत सोबत जोडण्यात येणारे फॉर्म भरून जमा करावे .
२) सदर बैठकीत मूळ मालक व आर्किटेक्ट यांनी आपला प्रस्ताव कमिटीपुढे सादर करावा .
३) सदर प्रस्तावावर कमिटीची चर्चा होऊन निर्णय दिला जातो .